कंपनी प्रायव्हेट लिमिटेड आणि शिपाहंड.कॉम प्रायव्हेट लिमिटेड आणि महानंदी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि श्रीवल्लभ टेक्सटाईल प्रायव्हेट लिमिटेड आणि केशव पॉवर लिमिटेड आणि श्री निर्माण लिमिटेड आणि रामा इनव्हेस्टमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांचे प्रत्येकाचे भागधारक आणि धनको यांच्यामधील विलीनीकरणाच्या योजनेस ("योजना") मंजूरीच्या आदेशासाठी, याचिकादार कंपनी महानंदी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड यांनी कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम २३० ते २३२ सह कलम ६६ अंतर्गत दिनांक ६ जून, २०१७ रोजी याचिका सादर केली होती आणि ती राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाच्या (एनसीएलटी) मुंबई न्यायपीठासमोर दिनांक २२ जून २०१७ रोजी दाखल करुन घेण्यात आली होती आणि सदर याचिका सुनावणीसाठी मुंबई न्यायपीठासमोर दिनांक १९ जुलै २०१७ रोजी ठेवण्यात आली आहे.

कोणत्याही व्यक्तीस सदर याचिकेस समर्थन किंवा विरोध करावयाचा असल्यास त्यांनी त्यांच्या उद्देशाची, त्यांनी किंवा त्यांच्या अधिवक्त्यांनी स्वाक्षरित केलेली, त्यांचे नाव व पत्त्यासहित सूचना याचिकादार यांच्या अधिवक्त्यास याचिकेच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कमीत कमी दोन दिवस आधी पोहोचेल अशा रितीने पाठवावी. त्यांना याचिकेस विरोध करावयाचा असल्यास, विरोधाची पार्श्वभूमी किंवा याचिकेच्या विरोधामध्ये वापरावयाचे प्रतिज्ञापत्र, मा. राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई न्यायपीठ यांच्यासमोर, ६वा मजला, फाऊंटन टेलिकॉम बिल्डींग, २ महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे पाठवावी व त्याची प्रत याचिकादार यांचे अधिवक्ते यांना सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कमीत कमी दोन दिवस आधी पाठवावी.

कोणत्याही व्यक्तीस याचिकेची प्रत हवी असल्यास त्यासाठी विहीत शुल्क भरल्यास ती निम्नस्वाक्षरीकार यांच्याद्वारे उपलब्ध करण्यात येईल.

दिनांक ०७ जुलै २०१७

हेमंत सेठी अँण्ड कंपनी करिता
स्वाक्षरी/-
याचिकादार यांचे अधिवक्ते
१६०२, नव परमाणु, अमर सिनेमाच्या मागे, चेंबूर, मुंबई ४०००७१

|| Vasudeva Kutumbakam ||

झी मीडिया कॉर्पोरेशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : कॉंटिनेंटल इमारत, 135, डॉ. ॲनी बेझंट मार्ग,
वरळी, मुंबई 400 018
दूरध्वनी : +91-22-71061234 फॅक्स : +91-22-23002107
सीआयएन : L92100MH1999PLC121506 वेबसाईट : www.zeenews.india.com

समभागधारकांना सूचना

याद्वारे कंपनी अधिनियम 2013 च्या कलम 124 मधील तरतुदी सोबत वाचले जाणारे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखांकन, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, 2016 सुधारल्यानुसार (नियम), या अन्वये कंपनीला सलग सात वर्षे किंवा त्याहून अधिक काळासाठी लाभांश न दिलेल्या किंवा लाभांशाचा दावा न केलेल्या समभागांचे हस्तांतरण गुंतवणूकदार शिक्षण आणि सुरक्षा निधी (आयईपीएफ) निलंबन खात्यामध्ये करणे आवश्यक आहे.

सदर नियमांचे पालन करत, कंपनीने स्वतंत्रपणे संबंधित भागधारकांना यथोचित संदेश त्यांच्या अलिकडच्या ज्ञात पत्त्यावर (पत्त्यांवर) पाठवलेला आहे (ज्यांचे भाग आयईपीएफ निलंबन खात्यात हस्तांतरित होण्यास पात्र आहेत). कंपनीने अशा भागधारकांचे पूर्ण तपशीलही तिच्या www.zeenews.india.com या वेबसाईटवर अपलोड केलेले आहेत.

त्यानुसार, सर्व समभागधारकांना नियमांच्या आवश्यकतांनुसार याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी सदर नियमांमध्ये उलेखित प्रक्रियेचे पालन करत लाभांश न दिलेले/दावा न केलेले राहिलेल्या समभागांचे आयईपीएफ निलंबन खात्यामध्ये हस्तांतरण करेल. संबंधित भागधारकांनी, जे भौतिक स्वरूपात भाग बाळगून आहेत आणि ज्यांचे भाग आयईपीएफ निलंबन खात्यामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत, नोंद घ्यावी की मूळ भाग प्रमाणपत्रा(त्रां)च्या जागी आयईपीएफ निलंबन खात्यात अशा भागांचे हस्तांतरण करण्याच्या हेतुने डुप्लिकेट भाग प्रमाणपत्रा(त्रां)चे निर्गमन झाल्यावर मूळ भाग प्रमाणपत्र(त्रे) आपोआप रद्दबादल होतील आणि अव्यवहार्य होतील. कंपनीने तिच्या वेबसाईटवर अपलोड केलेले तपशील हे कंपनीने नियमांन्वये भागांचे हस्तांतरण करण्याच्या हेतुने डुप्लिकेट भाग प्रमाणपत्रा(त्रां)चे निर्गमन करण्यासंदर्भातील पुरेशी सूचना म्हणून धरण्यात यावेत आणि मानण्यात येतील.

नोंद घ्यावी की आयईपीएफकडे हस्तांतरित दावा न केलेले लाभांश आणि समभाग, यामध्ये अशा भागांवर संचयित होणारे सर्व लाभ समाविष्ट, जर असतील तर, यांचा दावा त्यांच्याद्वारे आयईपीएफ प्राधिकरणाकडून नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या प्रक्रियेचे पालन केल्यावर करता येऊ शकतो. भागधारकांनी नोंद घ्यावी की नियमांन्वये आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित दावा न केलेल्या लाभांशाच्या रकमेच्या आणि समभागांच्या संदर्भात कंपनीविरोधात कोणताही दावा राहणार नाही.

यासंदर्भात कोणताही प्रश्न असल्यास कंपनीच्या कंपनी सचिवाकडे नोंदणीकृत कार्यालयात किंवा complianceofficer@zeemedia.esselgroup.com यांस ईमेल करून किंवा कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजंट्स, मे. लिंक इनटाईम इंडिया प्रा.लि. यांच्याकडे त्यांचे कार्यालय सी-101, 247 पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - 400083, दूरध्वनी : 022-49186000 ईमेल : mt.helpdesk@linkintime.co.in येथे विचारता येतील.

झी मीडिया कॉर्पोरेशन लिमिटेड साठी
सही/-
पुष्पल संघवी
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : 6 जुलै, 2017

Reliance
Industrial Infrastructure
Limited

नोंदणीकृत कार्यालय: एन के एम इंटरनॅशनल हाऊस, ५वा मजला, १७८ बॅकबे रिक्लमेशन,
एल आय सी योगक्षेमा बिल्डिंगच्या मागे, बाबुभाई चिनाय मार्ग, मुंबई - ४०० ०२०
दूरध्वनी: ०२२-४४७७ ९०५३. ई-मेल: investor_relations@riil.in
CIN: L60300MH1988PLC049019

सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीच्या सदस्यांची एकोणतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी सकाळी ११ वाजता ४था मजला, वालचंद हिराचंद सभागृह, इंडियन मर्चन्टस् चेम्बर, आयएमसी मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० ('सभा') येथे होईल.

सभेमध्ये करण्यात येणाऱ्या सामान्य व विशेष कामकाजाचे मुद्दे नमूद करणारी सभेची सूचना व त्याचबरोबर ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचे स्वतंत्र आणि एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय विवरण, लेखापरीक्षकांचा आणि संचालक मंडळाचा त्यावरील अहवाल, व्यवस्थापनाची चर्चा आणि विश्लेषण, व्यावसायिक जबाबदाऱ्यांचा अहवाल, कॉर्पोरेट गव्हर्नन्स अहवाल, उपस्थिती पत्रक आणि प्रॉक्सी प्रपत्र समाविष्ट असलेला २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा कंपनीचा वार्षिक अहवाल सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पोस्टाने पाठविण्यात आले आहेत आणि ज्यांनी डिपॉझिटरीज/कंपनीपाशी त्यांचा ई-मेल ॲड्रेस नोंदविला आहे अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. परंतु ज्यांना वरील दस्तऐवजांची प्रत्यक्ष प्रत हवी आहे अशा सदस्यांनी आपला फोलिओ क्रमांक/ग्राहक आयडी नमूद करून riilnkm@karvy.com येथे ई-मेल पाठवावे. अन्यथा, सदस्य कंपनीचे समभाग हस्तांतरण एजन्ट, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड यांना ह्या सूचनेच्या शेवटी देण्यात आलेल्या पत्त्यावर पत्र पाठवून विनंती करू शकतात.

सदस्यांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की सभेची सूचना आणि वरील दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर www.riil.in उपलब्ध आहेत आणि वरील दस्तऐवजांच्या प्रती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात (शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सर्व कामकाजाचे दिवशी कामकाजाच्या वेळेत सभेच्या तारखेपर्यंत तपासणीसाठी उपलब्ध असतील.

सभेला हजर राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेला सदस्य स्वतः ऐवजी सभेला हजर राहण्यास आणि मतदानाच्या वेळी पोलद्वारे मतदान करण्यास प्रॉक्सीची नेमणूक करू शकतो आणि प्रॉक्सी कंपनीचा सदस्य असण्याची गरज नाही. प्रॉक्सीची नेमणूक करणारे दस्तऐवज वैध होण्यासाठी ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभा सुरु होण्याच्या किमान ४८ तास अगोदर जमा केले पाहिजेत.

कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ९१ आणि त्या अंतर्गत लागू नियमांतर्गत ह्याद्वारे अधिक सूचना देण्यात येत आहे की, संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी शिफारस केलेला लाभांश मिळण्यास पात्र सदस्य निश्चित करण्यासाठी कंपनीने शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०१७ ही रेकॉर्ड तारीख निश्चित केली आहे.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे सदस्य आणि इतर व्यक्तींना, लाभांश मिळविण्यासाठी त्यांचे हस्तांतरण, ट्रान्समिशन, पत्त्यातील बदल, बँकेची बंधनकारक माहिती वगैरे कंपनीचे समभाग हस्तांतरण एजंट कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडे किंवा त्यांच्या कोणत्याही इन्व्हेस्टर रिलेशन सेन्टरकडे रेकॉर्ड तारखेला किंवा तत्पुर्वी पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे.

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २०, सुधारित, आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स व डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस) अधिनियम, २०१५ मधील कलम ४४ सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०८ मधील तरतुदींच्या अंतर्गत, कंपनी आपल्या सदस्यांना सभेमध्ये मंजूर करण्याच्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्य सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून ("दूरस्थ ई-मतदान") इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेचा उपयोग करून त्यांचे मत देऊ शकतील. कंपनीने ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड ("कार्वी") यांची सेवा घेतली आहे.

सभेच्या सूचनेच्या प्रतीसोबत दूरस्थ ई-मतदानासंबंधी माहिती व त्याचप्रमाणे यूजर आयडी व पासवर्ड संबंधी माहिती सदस्यांना पाठविण्यात आली आहे. सदर माहिती आणि सभेची सूचना कंपनीच्या वेबसाईटवर www.riil.in येथे आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर https://evoting.karvy.com येथे उपलब्ध आहे.

दूरस्थ ई-मतदान सुविधा सोमवार, दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) वाजता सुरू होईल आणि गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ) वाजता बंद होईल. ह्या तारखेनंतर आणि वेळेनंतर दूरस्थ ई-मतदान करण्याची परवानगी नाही.

शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०१७ ह्या अंतिम मुदतीच्या तारखेला ज्या सदस्यांचे/लाभधारक मालकांचे नाव कंपनीच्या रजिस्टरवर असेल फक्त तेच दूरस्थ मतदानास त्याचप्रमाणे सभेच्या ठिकाणी मतदान करण्यास पात्र असतील.

सभेची सूचना पाठविल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि अंतिम मुदतीच्या तारखेला समभाग धारण करत असल्यास, त्यांनी evoting@karvy.com येथे विनंती पाठवून यूजर आयडी आणि पासवर्ड मिळवावा. यूजर आयडी आणि पासवर्ड मिळविण्याची तपशिलवार पद्धती सभेच्या सूचनेत देण्यात आली आहे जी कंपनीच्या वेबसाईटवर आणि कार्वीच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. जर सदस्याने कार्वी यांचेपाशी ई-मतदानासाठी अगोदरच नोंदणी केली असेल तर तो त्या युजर आयडीचा आणि पासवर्डचा उपयोग दूरस्थ मतदान करण्यासाठी करू शकतो.

ज्यांनी दूरस्थ मतदानाद्वारे त्यांचे मतदान केले असेल असे सदस्य सभेला उपस्थित राहू शकतात परंतु पुन्हा मतदान करण्यास पात्र नसतील.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे ('इन्स्टा पोल') मतदान करण्याची सुविधा सभेच्या वेळी उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने आपले मतदान केले नाही असे सभेला उपस्थित राहणारे सदस्य सभेच्या वेळी इन्स्टा पोल पद्धतीने मतदान करू शकतील. कंपनीने सभेच्या ठिकाणी कार्वी यांची दूरस्थ ई-मतदानासाठी वापरलेली तिच इलेक्ट्रॉनिक यंत्रणा उपलब्ध करून दिली जाईल आणि सर्व ठरावांवर विचार होईपर्यंत आणि सभेत मतदान होईपर्यंत सदर सेवा कार्यान्वित राहील.

कंपनीच्या वेबसाईटवर (www.riil.in) येथे आणि बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) यांच्या वेबसाईटवर देखील सूचना पाहता येईल.

ई-मतदानाशी संबंधित काही प्रश्न असल्यास, कृपया कार्वी यांच्या वेबसाईटवरील हेल्प आणि एफएक्यूज विभागाला भेट द्या. सदस्यांनी कृपया ई-मतदानासंबंधी चौकशीसाठी/तक्रारीसाठी/इतर कोणत्याही प्रकारची विनंती करण्यासाठी समभाग हस्तांतरण एजंट यांच्या खालील संपर्काच्या माहितीची नोंद घ्यावी:

श्री. एस. पी. वेणूगोपाल - डेप्युटी जनरल मॅनेजर, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबॉवली, फायनान्शीयल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, हैद्राबाद ५०० ०३२; टोल फ्री क्र : १८००-३४५४-००१; ई-मेल: evoting@karvy.com.

संचालक मंडळाचे आदेशाने
रिलायन्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/-
शैलेश ढोलकिया
कंपनी सेक्रेटरी आणि कंम्पलायन्स ऑफिसर

ठिकाण : मुंबई
दिनांक : ६ जुलै, २०१७

www.riil.in